दै. लोकपत्र दिनांक : 04.11.2019

लोकपत्र ५ नोव्हेंबर

# गोल्डन मॅन कोकुलवार यांच्यावर गोळीबार करणारे दोघेजण जेरबंद; विशेष पथकाची कारवाई

**नांदेड/प्रतिनिधी**

शहरातील गोल्डनमॅन म्हणून ओळखले जाणारे काँग्रेसचे माजी नगरसेवक गोविंद कोकुलवार यांच्यावर गोळीबार करणाऱ्या दोन आरोपींना पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाने दोघांना ताब्यात घेतले आहे, अशी माहिती पोलिस अधीक्षक विजयकुमार मगर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

व्यापारी तथा काँग्रेसचे माजी नगरसेवक गोविंद कोकुलवार हे त्यांच्या निवासस्थानी दि. १७ ऑगस्ट रोजी गाडी पार्क करून जात असताना अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गोळीबार केला. या प्रकरणी इतवारा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

कुविख्यात गुन्हेगार हरविंदरसिंघ ऊर्फ रिंदा चरणसिंघ संधू याचे टोळीतील इतर साथीदार बजरंग उर्फ योध्दा भिमराव नरवाडे, रा. अंबाळा, ता. हदगाव, राजु देवराव राऊत रा. बरड शेवाळा ता. हदगाव, सुभाष पवार रा.बरड शेवाळा ता.हदगाव, गुरुचरणसिंघ लक्की पि. संपुर्णसिंघ गील वय ३० वर्ष, रा. अबचलनगर नांदेड, सय्यद नजिदउद्यीन गुडु पिता सय्यद मुनीरोद्दीन वय ३४ वर्षे



रा.आसरानगर, नांदेड आणि इतर यांनी केला असल्याचे निष्पन्न झाले. यापूर्वी तिघांना पोलिसांनी अटक केली होती.

या गुन्हयात प्रत्यक्ष गोळीबार करणारे आरोपी निष्पन्न होऊनही अटक होत नसल्याने सर्व सामान्य नागरीकांच्या मनामध्ये भीती होती. आरोपी हे तेलंगणा राज्यामध्ये असल्याबाबतच्या मिळालेल्या गुप्त माहितीवरून व घटनेचे गांभीर्य ओळखुन पोलीस अधिक्षक यांनी एका टिमला यापूर्वी तेलंगणा राज्यामध्ये दोनवेळा पाठविले होते. मात्र आरोपी पकडण्यात पोलिसांना अपयश आले. तदनंतर गुरुचरणसिंघ लक्की पि. संपुर्णसिंघ गील, सय्यद नजिदउद्यीन गुड्डु पिता सय्यद मुनीरोद्दीन हे विदर्भात असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. या माहितीवरून पोलीस अधीक्षक यांचे अधिपत्याखालील टीम विदर्भात रवाना करण्यात आली.

सदर टिमने विदर्भात जाऊन विविध ठिकाणी सातत्याने शोध घेऊन विदर्भातील नागपूर जिल्ह्यातून दि. २ नोव्हेंबर रोजी दोघांना ताब्यात घेतले आहे. या दोन्ही आरोपीविरूद्ध वेगवेगळ्या ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती पोलिस अधीक्षकांनी दिली. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी अभिजीत फस्के, पोलिस निरीक्षक प्रदीप काकडे यांची उपस्थिती होती.